**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ५४/२०२१</u>**

**<u>CNR No. MHSO060007352021</u>**

बाळू मोरे वगैरे

वि.

ग्रामपंचायत, चळे वगैरे

## <u>आदेश निशाणी क्र. ३२ वर</u>

०१. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ७ रुल ११ प्रमाणे हा अर्ज दाखल केला आहे.

०२. प्रतिवादी क्र. १ व २ ग्रामपंचायत, चळे यांनी दिनांक २१/०७/२०२१ रोजी केलेला ठराव हा बेकायदेशीर आहे. तसेच त्या ठरावाच्या आधारे पाठवलेली नोटीस कायदेशीर नाही. गाव नकाशामध्ये नमूद केलेला चळे ते खरसोळी रस्त्या व्यतिरिक्त दावा मिळकतमधून प्रतिवादी यांनी नव्याने रस्ता निर्माण करु नये असा निरंतर मनाई हुकूम मिळणेसाठी हा दावा दाखल करण्यात आलेला आहे.

०३. वादी यांची सर्व कथने प्रतिवादी क्र. १ व २ यांनी नाकारलेली आहेत. सार्वजनिक रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याचा अधिकार ग्रामपंचायत यांना आहे. दावा दाखल करण्यापुर्वी ग्रामपंचायत कायदा कलम १८०(२) प्रमाणे नोटीस दिलेली नाही. त्यामुळे हा दावा चालवण्याचा अधिकार या न्यायालयास नाही. सबब हा दावा रद्दबातल करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी क्र. १ व २ यांनी केलेली आहे.

०४. त्यावर वादी यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्र. ३५ प्रमाणे दिलेले आहे. हा दावा दाखल करण्यापुर्वी दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ८०(२) प्रमाणे नोटीसचा कालावधी माफ करण्याचा आदेश न्यायालयाने केलेला आहे. त्यानंतर हा दावा दाखल करण्यात आलेला आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी त्यांचे कैफियतमध्ये सन २०१९ पासून

रस्त्यावरील अतिक्रमण हटवण्यासाठी कार्यवाही सुरु होती असे नमूद केले आहे. अतिक्रमण काढण्यासाठी जिल्हाधिकारी यांची परवानगी घेतलेली नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात यावा असे त्यांनी सांगितले.

०५. प्रतिवादी क्र. १ व २ यांचे वकील श्री. व्ही. के. जाधव तसेच वादी यांचे वकील श्री. एम. व्ही. कसबे यांचा युक्तिवाद ऐकला.

०६. महाराष्ट्र ग्रामपंचायत कायदा कलम ५३ प्रमाणे सार्वजनिक रस्ता व खुली जागा या वरील अतिक्रमण काढण्याचा अधिकार ग्रामपंचायतला आहे. तसेच कलम १८० प्रमाणे कोणताही ग्रामपंचायत सदस्य अथवा कर्मचारी यांनी सदभावनेने केलेली कोणत्याही कृती विरुध्द तीन महिने मुदतीची नोटीस दिल्याशिवाय त्यांचे विरुध्द कार्यवाही करता येणार नाही असे नमूद करण्यात आलेले आहे. जिल्हापरिषद व पंचायत समिती कायदा कलम २८० प्रमाणे देखील त्यांचे विरुध्द दावा दाखल करावयाचा असेल तर एक महिना अगोदरची नोटीस दिली पाहिजे अशी तरतुद करण्यात आली आहे.

०७. दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ७ रुल ११ प्रमाणे जर दाव्यातील कथनावरुन असे निदर्शनास आले की, दावा एखाद्या कायद्यानुसार प्रतिबंधीत केलेला आहे तर सदर दावा रद्द करण्याची तरतुद आहे.

०८. वादी यांचे वकील यांनी मला सांगितले की, प्रतिवादी यांनी त्यांच्या कैफियत निशाणी क्र. ३० मध्ये सन २०१९ सालापासून अतिक्रमण दुर करण्याच्या दृष्टीने निवेदने देण्यात आली होती असे नमूद केले आहे. तसेच त्यांनी ***मा. ना. उच्च न्यायालय, मुंबई यांचे ग्रामपंचायत कुही वि. विजयकुमार राधेशाम भालोदिया या प्रकरणातील १९८६ महाराष्ट्र लॉ जरनल पान क्र. ६१८*** मधील न्यायनिवाड्याचा आधार घेतला. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, ग्रामपंचायत यांनी पुर्वी केलेल्या कृतीबाबत जर दावा करावयाचा असेल तर कलम १८०(२) प्रमाणेची नोटीस पाठवणे बंधनकारक आहे. परंतु जर ग्रामपंचायतच्या

पुढील कार्यवाहीस रोध लावण्यासाठी दावा दाखल केला असेल तर त्यासाठी मात्र नोटीस पाठवण्याची आवश्यकता नाही. या प्रकरणामध्ये केवळ ग्रामपंचायत यांनी ठराव करुन नोटीस पाठवली आहे. त्या आधारे पुढील भविष्यात कोणतीही कार्यवाही करुन तये अशी मागणी वादी यांची आहे. त्यामुळे ग्रामपंचायतच्या भविष्यातील कार्यवाही (Future action) विरुध्द मागणी असल्यामुळे सदर नोटीस पाठवणे आवश्यक नाही असे मी नमूद करतो.

०९. तसेच प्रकरणाची तातडी विचारात घेऊन सरकार विरुध्द दावा दाखल करण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ८० प्रमाणे आवश्यक असलेली नोटीसचा कालावधी क्षमापित करण्यात आलेला आहे. ग्रामपंचायत यांनी केलेल्या कोणत्याही कृतीचा कायदेशीरपणा तपासून पहाण्याचा अधिकार न्यायालयाला आहे. त्यामुळे हा दावा दाखल करण्यासाठी व त्यावर न्यायालयीन चौकशी करण्यासाठी कोणतीही बाधा येत नाही. सबब मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

## आ दे श

अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

स्वाक्षरी/-
( श्रीकृष्ण हरीभाऊ इनामदार )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर

दि. २२/१०/२०२१

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | A. S. Bavikar |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D., Pandharpur |
| Order signed by the P. O. on | : | 23/10/2021 |
| Order uploaded on | : | 23/10/2021 |